# श्री. यशवंत महादेवराव ढबाले

सेवक क्र. ७७७ मु. मोरगांव, पो. कान्हाळगांव, जि. भंडारा

आमच्या कुटुंबात अनेक वर्षापासून अनेक देवदेवतांना आम्ही पूजत होतो. उदा. महादेव, कुलदेव, मारुती, मातादेवी, नरसिंहदेव, सोनबा देव. याशिवाय तंत्रमंत्राचेसुध्दा उपचार करुन समाधान नव्हते. माझी भावसून आजारी पडली. आजारपणात मुठी बांधणे, डोळे ताणणे, बोलणे बंद होणे हे लक्षण होते. त्यावेळी सुध्दा अनेक देवदेवतांचे, कुलदेवतांचे, मंत्रोपचाराचे आणि डॉक्टरी औषणोपचार करुनही आराम झाला नाही. भावसून दिवसेंदिवस अशक्त होत गेली. मोहाडीच्या वैद्यानी न मिळणाऱ्या वस्तु सांगितल्या. उदा. नर–मादीचे काटे आणि आणखी वस्तू सांगितल्या. मी हजारो रुपये खर्च करुन वस्तू आणल्या व त्यांच्याकडून उपाय केला पण काहीच फायदा झाला नाही. वैद्यांनी सांगितले, हिला भूतबाधा झाली असावी. तुम्ही डॉक्टरी उपचार करुन पाहा असे वैद्यांनी सांगितले. डॉक्टरांचे औषध सुरु केले. आराम मिळाला नाही. परसवाड्याला कड्याकडे देवी येते. त्यांच्याकडे पंधरा दिवस गेलो. त्यांनी घराची बांधणी करण्याकरिता साडेतीनशे रुपये मागितले. त्यांनाही मी कंटाळलो. मला समाधान मिळाले नाही. भावसुनेची प्रकृती अधिकच खराब होत गेली. त्यावेळी मी कांद्री ह्या गावी शिक्षक होतो. कांद्री येथील श्री. लटाऊ पिलारे यांना एका भगवंताच्या मार्गाची माहिती होती. त्यांनी मी भावसुनेच्या प्रकृतीबद्दल सांगितले. श्री. लटारु पिलारे यांनी माझा परिचय घेऊन श्री. गडीरामजी डोणारकर, मु. भांडारबोडी हे कांद्रीच्या बाजारात आले असता त्यांच्याशी करुन दिला. श्री. गडीरामजी डोणारकर यांनी मला एका भगवंताचा परिचय करुन दिला व ह्या मार्गावर मरण्याकरिता यावे लागते असे सांगितले. तसेच येण्याच्या आधी तुम्ही मानित असलेल्या देवदेवतांचे उपाय करा. औषधोपवार करा आणि त्यानंतरही फायदा झाला नाही तर मरण्याकरिता ह्या मार्गावर या असेही त्यांनी सांगितले. त्यांनी मला एका भगवंताची अनेक उदाहरणे देऊन मार्गदर्शन केले. पण 'उलट्या घागरीवर पाणी' या म्हणीप्रमाणे मरण्याचाच शब्द घोळ घालून बसला.

मनुष्य वाचविण्याकरिता खूप प्रयत्न करतो. भावसुनेची प्रकृती दिवसेंदिवस बिघडतच होती. आंधळगावचे श्री. दीनदयाल मिस्त्री हे एक जाणते होते. त्यांच्याकडे मला एका मित्राने नेले. त्यांचाही उपचार केला. रोज बेशुध्द पडणारी भावसून अकरा

दिवस बेशुध्द पडली नाही. म्हणून ठरल्याप्रमाणे त्या जाणत्याचे पैसे दिले. घरी परत आल्यावर पुन्हा ती बेशुध्द पडली. त्या जाणत्याला घरी बोलावून आणले. त्यांनी सांगितले की तुमच्या गावाचाच वैद्य करणारा आहे म्हणून ह्या बाईची प्रकृती नेहमी बिघडते. त्याची बांधणी करावी लागेल. त्याकरिता मी पैसे घेणार नाही. मी सांगतो ते सामान मला आणून द्या. त्यांनी मला सामानाची यादी दिली. त्यात घोड्याच्या नालीचे उलट्या तोंडाचे खिळे, हत्तावळी आणि इतर प्रकारचे सामान होते. हत्तावळी हे हिमालयाच्या पायथ्यावर मिळते. तेथून ती तुम्ही कशी आणणार? त्यासाठी खर्चही भरपूर करावा लागेल. ती हत्तावळी धोप या गावी आहे. ती तुम्हाला त्यांच्याकडून ३५० रुपयाला मिळू शकेल. तेव्हा मला लुबाडणाऱ्या मोहाडीच्या वैद्यांची आठवण झाली आणि हा पण मला लुबाडत आहे अशी मनात शंका आली.

सर्व उपाय करुन हताश झालो तेव्हा मला एका भगवंताची आठवण झाली. कुटुंबातील सर्वांना एकत्र बसून विचार केला आणि न मरता एकाच भगवंताच्या नावाने मेलेले बरे असा निर्धार करुन मार्ग घेण्याकरिता कांद्री ह्या गावी जाऊन श्री. लुटारु पिली यांच्याकडून बाबा हनुमानजीच्या नावाची पाच दिवसांची साधी अगरबत्ती घेतली. ह्या पाच दिवसांच्या अगरबत्तीमध्येच अनुभव आला. माझी भावसून दररोज़ १० ते १५ वेळा निपचित पडत होती. ती एकही वेळा तशी पडली नाही. हा अनुभव श्री. लुटारु पिलारे यांना जाऊन सांगितला. त्यानंतर श्री. गडीरामजी डोणारकर हे कांद्रीच्या बाजारात आले होते. त्यांच्याकडे श्री. पिलारे हे मला घेऊन गेले. श्री. डोणारकर यांनी एका भगवंताचा परिचय व महानत्यागी बाबा जुमदेवजींनी दिलेले तत्त्व, शब्द आणि नियमांचे मार्गदर्शन केले. त्यानंतर मला सात दिवसांचे, अकरा दिवसांचे, एकवीस दिवसांचे साधे कार्य मिळाले व नंतर बेवाळीस दिवसांचे त्यागाचे कार्य मिळाले. ह्या बेचाळीस दिवसांत आम्हाला परिपूर्ण समाधान मिळाले. भावसुनेचे दुःख नाहीसे झाले.

महानत्यागी बाबा जुमदेवजींनी दिलेले ज्ञान जागृत आहे. ते ज्ञान कोणत्याही आत्म्याला घर्षण केल्यास तो आत्मा जागृत होतो हे प्रत्यक्ष अनुभवास आले आहे. बाबांनी दिलेल्या तत्त्व, शब्द, नियमांच्या ज्ञानाने आमचे अंधारलेले जीवन प्रकाशमय झाले. आमच्या जीवनातील दुःख नाहीसे होऊन आमच्या जीवनात सुख समाधान आले आहे.

हा सर्व भगवान बाबा हनुमानजी आणि महानत्यागी बाबा जुमदेवजी यांच्या कृपेचाच परिणाम आहे.

* * * * *